

# शोभिवंत मासे – बीजोत्पादन आणि संवर्धन व्यवस्थापन
## प्रशिक्षण कार्यक्रम
## दि. १९ फेब्रुवारी २०१८ ते २३ फेब्रुवारी २०१८

सद्य स्थितीत, शोभिवंत मत्स्य संवर्धन तसेच बीजोत्पादन या व्यवसायास महत्व प्राप्त झाले असुन, यातुन स्वयंरोजगार निर्मितीसाठी मोठा वाव आहे. कोकण तसेच महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्हातुन या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्याची संधी असुन, त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज आहे.

या साठी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने निर्धारित केलेल्या किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमांतर्गत मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय येथे दि.१९ फेब्रुवारी २०१८ ते २३फेब्रुवारी २०१८ या कालावधीत शोभिवंत मासे – बीजोत्पादन आणि संवर्धन व्यवस्थापन या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात येत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी :

१. प्रत्येक प्रशिक्षणार्थी कडुन प्रशिक्षण शुल्क ₹ २०००/– आकारले जाईल.
२. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षण कालावधीत आपल्या निवास आणि भोजनाची व्यवस्था स्वतः करावयाची आहे.
३. प्रशिक्षण कार्यक्रमातील सैधातिक आणि प्रात्यक्षिक वर्गास उपस्थिती आवश्यक असुन, त्यानंतर प्रशिक्षण पुर्ण केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक प्रदान करण्यात येईल.

या प्रशिक्षण कार्यक्रमात, विविध शोभिवंत मत्स्यजातींची ओळख, त्यांचे बीजोत्पादन, संगोपन, खाद्य व्यवस्थापन, जिवंत खाद्य निर्मिती, पाण्याचे व्यवस्थापन, आरोग्य व्यवस्थापन व उपचार, अर्थशात्र व प्रकल्प अहवाल याविषयी विस्तृत माहिती सैधातिक आणि प्रात्यक्षिक वर्गात देण्यात येईल. या व्यतिरिक्त, प्रकल्प भेटीद्वारे, जागेची निकड, प्रकल्प रचना याची माहिती घेता येईल.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या नावनोंदणी साठी डॉ. दबीर पठाण, मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी यांच्याशी ९४२२४४१३२२ किंवा ९४२२४३३०९९ या क्रमांकावर कृपया संपर्क साधावा.

